रविवार पुरवणी
महाराष्ट्र टाइम्स
११ जून १९७८

# विद्वान् सर्वत्र 'पूज्य'ते ?

**विद्वान म्हटला की त्याच्यापुढे राज्यकर्ते मान लववीत. समाजातील तो आदराचे स्थान असे. पण ही स्थिती आता आपल्याकडे पालटली आहे. राज्यकर्ते म्हणजे मंत्री, खासदार, आमदार, अधिकारी यांना जो मान मिळतो तो विद्वानांना मिळेनासा झाला आहे. असे घडण्यामागे अनेक कारणे आहेत. खुद्द विद्वानांचे आचरण हेही त्यातले एक आहेच. ख्यातनाम शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचे या संदर्भातील हे काही विचार**



रघुवंशातल्या पाचव्या सर्गात वर्णिलेला प्रसंग. विश्वजित यज्ञात आपली सर्व संपत्ती दान करून टाकलेल्या रघु राजाकडे कौत्स नावाचा एक गरीब स्नातक आला. रघूने त्याचे योग्य स्वागत केले – सोन्याची भांडी दान देऊन टाकली असल्याने मातीच्या भांड्यात पाणी घेऊन त्याचे पाय धुतले – आणि येण्याचे कारण विचारले. रघूची दैन्यावस्था पाहून कौत्सालाच प्रश्न पडला; पण रघूच्या आग्रहावरून त्याने आपली गोष्ट सांगितली. शिक्षण संपल्यावर आपल्या गुरूला – वरतंतूला – गुरुदक्षिणा दिली पाहिजे. परन्तु कौत्स मुळातच गरीब असल्याने गुरुदक्षिणा नको असे वरतंतूने सांगितले. पण कौत्साने ती देण्याचा हट्टच धरल्यामुळे चिडून त्याने आपण शिकवलेल्या १४ विद्यांसाठी दर विद्येमागे एक कोटी सुवर्णमुद्रा मागितल्या ! अर्थात रघुसारख्या दानशूर राजाकडे येण्याव्यतिरिक्त कौत्सापुढे दुसरा पर्याय नव्हता.

रघूकडे धन उरले नसल्याने 'मी दुसरीकडे याचना करायला जातो,' असे कौत्स म्हणत असता, रघूने त्याला थांबवून घेतले. पृथ्वी जिंकली असल्याने बाहेरून – कुबेरावर स्वारी करून पैसे आणायचे त्याने ठरवले. पण कुबेराने घाबरून, रघू आक्रमणाला निघण्यापूर्वीच धनवृष्टी केली. रघूने ते सर्व धन कौत्साला घेऊन जाण्यास सांगितले, पण कौत्साला फक्त गुरुदक्षिणेपुरतेच धन न्यावयाचे होते.

प्राचीन भारतात राज्यकर्ते आणि अभ्यासक विद्वान यांच्यात कशा तऱ्हेचे संबंध होते, याची वरील प्रसंगावरून जाणीव होते. त्यावेळची परिस्थिती आणि आजची परिस्थिती यांची तुलना करून पाहूया !

कमिटीवर नेमतील. ह्या कमिटीचा रिपोर्ट जर त्या राज्यकर्त्यांच्या त्यावेळच्या विचारसरणीशी जुळत असेल तर त्याचा रबर स्टॅम्प म्हणून वापर करण्यात येईल. जर तो जुळत नसेल तर तो गिळून टाकण्यास किती तरी लाल फीतवाल्या फायली 'आ' वासून आहेतच ! किंवा त्याच्या विद्वत्तेची कदर म्हणून बिचाऱ्या वरतंतूला दिल्लीत एखाद्या सचिवाची जागा, नाही तर एखाद्या राष्ट्रीय संस्थेत संचालकाची जागा (आणि तो अगदीच दुर्दैवी असला तर) उत्तर भारतातल्या एखाद्या विश्वविद्यालयाच्या कुलगुरूची जागा देण्यात येईल.

'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते' : प्राचीन भारतात जन्मलेल्या उत्तम म्हणी आणि त्यांच्याशी विसंगत आजचे वातावरण ह्याचं हे एक

इत्यादी इत्यादी. शिक्षणक्षेत्राकडे जाण्याची प्रवृत्ती अभावानेच दिसून येईल. याचे एक कारण असे सांगण्यात येते की, शिक्षणक्षेत्रात पगार कमी; काम जास्त, म्हणून कोणी तिकडे स्वेच्छेने जात नाही. हा जरी वस्तुस्थितीचा एक भाग असला, तरी ते 'पूर्ण सत्य' म्हणता येणार नाही. परदेशांत, इंग्लंड - अमेरिकेतसुध्दा शिक्षणक्षेत्रापेक्षा इतर व्यवसायांत कमाई जास्त असते. असे असूनसुध्दा ज्यांचा शिक्षणाकडे, संशोधनाकडे कल आहे असे हुशार विद्यार्थी शाळा-कॉलेजांकडेच शिक्षक, संशोधक म्हणून पाऊल टाकतात. असे का ? कारण शिक्षणक्षेत्रात मान, काम योग्यपणे केल्याचे समाधान, पेशातले पावित्र्य इत्यादी गुण परदेशांत अजून शाबूत आहेत आणि जोपासले जात आहेत. दुर्दैवाने भारतात ती

तात विद्यापीठाच्या कुलगुरूलाही नसावी ही खेदाची गोष्ट नव्हे काय ? याची कारणमीमांसा केल्यास आपला समाज जितका दोषी ठरतो तितकेच शिक्षणक्षेत्रही ह्या परिस्थितीस जबाबदार ठरते. शिक्षणक्षेत्रातले सर्वसाधारण घटक – विद्यार्थी आणि अध्यापक – हे जबाबदारीने आपले कार्य पार पाडतात हे जरी गृहीत धरले, तरी काही थोड्याथोडक्या व्यक्तींच्या कारवायांमुळे शिक्षणक्षेत्राची प्रतिमा डागळली जात आहे यात शंका नाही. अशा तऱ्हेचे, राजकारण खेळून विद्यापीठ बंद करायला लावणारे, तथाकथित विद्यार्थी सर्वांना माहीत झालेतच. पण काही प्राध्यापकांचे नमुने जे माझ्या प्रत्यक्ष पाहण्यात आले आहेत ते असे :

**प्राध्यापक 'अ'** – हे वेगवेगळ्या समित्यांवर काम करण्याच्या निमि-

कारी कार्यालयाला (उदा. फॅमिली प्लॅनिंग, खेड्यांत कामे करा इत्यादी !) पोषक असला, तर सोन्याहून पिवळे. पुढे अशा उपक्रमांचा उपयोग प्राध्यापकापासून कुलगुरूपद गाठण्यासाठी होतो.

**प्राध्यापक 'ड'** : यांना अधिकारापेक्षा पैशाचे महत्त्व जास्त हे पटलेले असते. त्यामुळे 'मोक्याच्या' परीक्षांत परीक्षक म्हणून काम करण्याकडे त्यांचा प्रयत्न असतो. मार्कांची अफरातफर करून स्कॉलरला फेल आणि नापासाला पास करण्याच्या त्यांच्या पराक्रमामुळे मुक्याला वाचाळ करणारा परमानंद माधव विष्णूसुध्दा अवाक् होईल.

## दुर्दैवाची बाब

अशा तऱ्हेची उदाहरणे समोर असताना, विद्यार्थ्यांनीसुध्दा 'आचार्य

मते) गैरव्यवहार चालतात त्यांचे अनुदान काढून घ्यावे आणि प्रसंग आल्यास त्या बंदही कराव्यात.

## हे अशक्य नव्हे

ज्या संस्था खरोखर लायक आहेत त्यांचे संचालन ज्यांनी आपली विद्वत्ता खऱ्या अर्थाने प्रस्थापित केली आहे अशा विद्वानांकडे सोपवावे. त्याचप्रमाणे अशा संस्थांत प्रशासकांना प्राध्यापकांपेक्षा दुय्यम लेखले जावे : त्यांनी अध्यापकांना मदत करावी, त्यांच्यावर अधिकार गाजवू नयेत. अध्यापकांवरचा शिकवण्याचा बोजा कमी करून त्यांना नवीन वाचन करण्यासाठी आणि जमल्यास संशोधनासाठी वेळ द्यावा.

अर्थात ह्या सूचना अंमलात आणणे अवघड आहे याची मला जाणीव आहे. जोपर्यन्त शिक्षणक्षेत्रात

नाही. विद्यापीठाच्या कारभारात राजकारणी व्यक्तींनी ढवळाढवळ केल्याचीही उदाहरणे नाहीत.

केंब्रिजचे उदाहरण आणखी एका संदर्भात द्यावेसे वाटते. पूर्वी गणिताच्या परीक्षेत नंबर लावले जायचे आणि पहिल्या येणाऱ्यास सीनियर रँग्लर' हे पद बहाल केले जाई. (कै. अण्णासाहेब परांजपे हे भारताचे पहिले सीनियर रँग्लर होते). सीनियर रँग्लरला मोठा मान असे आणि म्हणून ते पद मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांत चुरस लागे. परीक्षेत 'उत्तरे कशी लिहावीत' यासाठी कोचिंग क्लासेस असत. पण केवळ उत्तर कसे लिहायचे हे समजले की विषय समजला असे नव्हे ! त्यामुळे कोचिंग क्लासमध्ये तयार होऊन सीनियर रँग्लर झाल्यावर अनेक वेळा पुढे त्या विद्यार्थ्यांकडून काही महत्त्वाची संशोधनाची कामगिरी घडत नसे. याची जाणीव होऊन १९०९ नंतर नंबर लावण्याची पध्दत बंद करण्यात आली ! सीनियर रँग्लर अर्थातच त्यापुढे झाले नाहीत आणि कोचिंग क्लासेसही आपोआप गेले. आज आपल्या शिक्षणक्षेत्रात कोचिंग क्लासेसना बरेच महत्त्व मिळाले आहे. शाळा, कॉलेजांत शिक्षणाकडे लक्ष पुरवले जात नाही म्हणून हे क्लासेस विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडतात. परंतु उत्तर कसे लिहायचे हे समजल्यामुळे आणि परीक्षेत उत्तम मार्क मिळाल्यामुळे आपल्याला विषय समजला, अशी गोड गैरसमजूत विद्यार्थ्यांनी करून घेऊ नये ! उलट ज्यांना विषयाची खरोखरीच आवड आहे अशा हुशार विद्यार्थ्यांनी कोचिंग क्लासला जाऊ नये असे माझे प्रांजल मत आहे.

## लाचारी नको

एखाद्या प्रथितयश शास्त्रज्ञाने,

यांची तुलना करून पाहूया !

## आज काय घडेल ?

समजा, आधुनिक कौत्साला शिक्षणाकरता शिष्यवृत्ती हवी आहे. तोसुध्दा पूर्वीप्रमाणे राज्यकर्त्यांकडे याचना करील. परन्तु त्याचा अर्ज राष्ट्रपती, पंतप्रधान, शिक्षणमंत्री किंवा त्याच्या राज्यातल्या मंत्र्यांकडे न जाता एखाद्या लहान सहान नोकरशहाच्या फायलीत गडप होईल. जर कौत्स नशीबवान असेल, त्याला वशिले लावता येत असतील, तर त्याला त्याच्या अर्जाचे उत्तर मिळेल. शिक्षणाचे संवर्धन-संगोपन करायला भारत सरकारने ज्या अनेक संस्था उभारल्या आहेत अशा एखाद्या संस्थेच्या स्कॉलरशिप / फेलोशिपसाठी ठराविक 'प्रोफॉर्म्या'नुसार अर्ज करायचा त्याला आदेश दिला जाईल. अत्यंत थोड्या वेळात अर्जाच्या अनेक प्रती (आणि इतर त्याला आधार देणाऱ्या कागदपत्रांच्या प्रती जोडून) पाठवण्याचे कठीण काम केल्यावर आणि इंटरव्ह्यू वगैरेंची भिंत ओलांडल्यावर तो सत्पात्र (आणि नशीबवान) असला, तर त्याला ती आर्थिक मदत मिळेल. अर्थात त्यासाठी त्याला एखादा मोठा बॉण्ड लिहून द्यायला लागेल तो वेगळा !

ही झाली कौत्साची हकीगत. आधुनिक वरतंतू काही फार समाधानकारक जीवन जगत असेल असे नाही. जर राज्यकर्त्यांच्या नजरेत त्याची विद्वत्ता भरली, तर ते त्याला एखाद्या उदाहरण आहे. आजच्या समाजात राज्यकर्ते – म्हणजे मंत्री, आमदार-खासदार, प्रशासकीय अधिकारी – यांना जो मान आहे तो विद्वानांना आहे का ? मला वाटते की, ह्या सूक्तीच्या उत्तरार्धात शब्द तोडून "विद्वान् सर्वत्र 'पूज्य' ते" असा पूज्य = शून्य हा मराठी अर्थ लावणे अधिक योग्य ठरेल.

## इंग्लंडमधील अनुभव

काही वर्षांपूर्वी अमेरिकेच्या नॅशनल सायन्स फाउण्डेशनतर्फे घेण्यात आलेल्या पाहणीत, सामान्य माणसाला त्याच्या मते समाजातले कुठचे घटक अधिक महत्त्वाचे याचे क्रम लावायला सांगण्यात आले. त्यावेळी पहिला क्रमांक लागला डॉक्टरांचा, आणि त्यापाठोपाठ शास्त्रज्ञांचा. इतर घटक ह्या दोघांच्या पुष्कळ मागे होते. मी १९६० मध्ये इंग्लंडमध्ये विद्यार्थी असताना माझ्या एका इंग्लिश विद्यार्थी मित्राला असाच प्रश्न विचारला असता त्याने ब्रिटिश समाजात विद्यापीठातील प्राध्यापकांचा क्रमांक बराच वर लागेल, असे सांगितले. माझ्या इंग्लंडमधील पुढील वास्तव्यात हे विधान खरे असल्याचा अनेक वेळा अनुभव आला.

आज जर भारतातील शालान्त परीक्षेत फार वरचा क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्याला विचारले. की तू पुढे कोण होणार ? तर त्याचे उत्तर असेल डॉक्टर, बिझिनेस मॅनेजर, चार्टर्ड अकौन्टन्ट, इंजिनियर, आय. ए. एस. किंवा तत्सम सरकारी नोकर... परिस्थिती नाही.

माझा स्वत:चा अनुभव सांगतो. बनारस विद्यापीठात बी. एस्‌सी. झाल्यावर मी केंब्रिजला जाण्याची तयारी करत असताना एका वयोवृध्द गृहस्थांनी, ज्यांनी स्वत: केंब्रिजमध्ये गणितात विक्रम केला होता आणि नंतर शिक्षणक्षेत्रात नाव कमावले होते, मला आय. ए. एस. कडे जाण्याचा सल्ला दिला. ही झाली १९५७ मधली गोष्ट. पंधरा वर्षांनी मी भारतात परत येत असताना येथील एका विद्यापीठाच्या नाणावलेल्या प्राध्यापकांनी मला सल्ला दिला : "भारतात आलास तर कुठल्या तरी संस्थेचा 'संचालक' म्हणून ये – प्राध्यापक म्हणून नको."

## शिष्याची गुरूवर ताण !

सांगण्याचे तात्पर्य इतकेच की, आपल्या समाजात एक असे मत प्रचलित दिसते की, अधिकाराची जागा हीच मानाची जागा. हे मत शिक्षणक्षेत्राबाहेर आहे तसेच शिक्षणक्षेत्रातही आहे. दुसऱ्यांवर अधिकार गाजवून स्वत:चे मोठेपण दाखवावे ही कला आपण ब्रिटिशांकडून शिकलो. असे अनेकदा सांगण्यात येते. तसे असेल तर ह्या कलेची गेल्या तीस वर्षांत जोपासना आणि वाढ करून आपण ब्रिटिशांना 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' असे म्हणायला लावले आहे.

इंग्लंडमध्ये शाळेतील शिक्षकाला समाजात जी प्रतिष्ठा आहे ती भारताने 'भारत दर्शन' करत फिरतात. गर्दीने भरलेल्या आगगाड्या, इंडियन एअरलाइन्सची अनियमित वेळापत्रके, प्रवासात होणारी जेवणाखाणाची वाताहत यांना न जुमानता काश्मीर ते कन्याकुमारी आणि सौराष्ट्रापासून आसामपर्यन्त भटकण्यात त्यांचा वेळ जातो आणि त्यामुळे त्यांच्या विद्यार्थ्यांची कुचंबणा होते.

## जयंत नारळीकर

**प्राध्यापक 'ब'** [ हे संशोधनाचे पेपर्स आणि पीएच. डी.चे विद्यार्थी फॅक्टरीत तयार केल्याप्रमाणे मोठ्या संख्येने काढू शकतात. आपले विद्यार्थी अठरा महिन्यांत पीएच. डी. मिळवू शकतात असा त्यांचा दावा असतो आणि टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेन्टल रीसर्च किंवा एखाद्या अमेरिकन विद्यापीठात पीएच. डी.ला पाच वर्षे का लागावी, हा त्यांना प्रश्न पडतो. अर्थात आपले विद्यार्थी लेक्चरर, रीडर म्हणून ठिकठिकाणी 'चिकटवून' आपला अधिकारकक्ष वाढवावयाचा इकडे त्यांचा कल असतो.

**प्राध्यापक 'क'** : हे कॉन्फरन्स, सेमिनार, प्रदर्शन इत्यादी भरवून तिथे मंत्री किंवा तत्सम प्रभावशाली व्यक्तींना उद्घाटन इत्यादी निमित्ताने बोलवून त्यांना 'आपणही आहोत' याची जाणिव करून देतात. त्यातून त्यांचा उपक्रम एखाद्या सरदेवो भव' ह्या सूक्तीवर अविश्वास दर्शवला तर काय आश्चर्य ? भ्रष्टाचार, राजकारण, अधिकारासाठी लठ्ठालठ्ठी इत्यादी प्रकार शिक्षणक्षेत्रात घडत असलेले पाहून समाजाने तरी काय म्हणून 'विद्वान् सर्वत्र पूज्यते' हे सार्थ करावे ? अशा 'विद्वानां'ची वेगळ्या अर्थाने 'पूजा' होणे आवश्यक आहे ! दुर्दैवाची गोष्ट ही की, काही थोड्या 'कंटकां'मुळे सबंध शिक्षणक्षेत्र अपमानाला पात्र होत आहे आणि शिक्षकांच्या अनेक रास्त मागण्यांकडे दुर्लक्ष होत आहे.

समाज विद्वत्तेपेक्षा अधिकाराला मान देतो म्हणून शिक्षणक्षेत्रातले काही विद्वान् 'येन केन प्रकारेण' अधिकाराच्या जागा मिळवण्याच्या खटपटीत असताना दिसतात. आणि अशा विद्वानांच्या लीला पाहिल्यामुळे समाजाचा शिक्षणक्षेत्राबद्दलचा आदर ढासळत आहे. असे हे गुन्तागुन्तीचे प्रकरण निर्माण झाले आहे.

यातून मार्ग काढण्यासाठी 'विद्वत्तेचे चीज होते' हे तत्त्व प्रथम प्रस्थापित झाले पाहिजे. त्यासाठी शिक्षणक्षेत्रात 'खरोखर उत्तम' कामगिरी बजावलेल्या संस्थांना अधिक सरकारी अनुदान, स्वायत्तता इत्यादी मार्गाने पुरस्कृत केले पाहिजे. 'खरोखर उत्तम' ह्या सदरात अठरा महिन्यांतले पीएचडी. किंवा भरपूर ग्रेस मार्क देऊन फर्स्ट क्लास आलेले विद्यार्थी बसत नाहीत हे येथे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. ज्या संस्थात असे (माझ्या सत्तेचे राजकारण खेळले जात आहे तोपर्यन्त वर सांगितलेले उपाय अंमलात आणायला ज्या धैर्याची आवश्यकता आहे ते सध्याच्या कुठल्याही पक्षाच्या नेत्यांमध्ये नाही. परंतु ह्या सूचना अशक्य कोटीतल्या नाहीत हे मी स्वानुभवाने सांगतो. मुम्बईत टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेन्टल रीसर्चमध्ये जे अभ्यासाचे, संशोधनाचे वातावरण आहे त्याच्या मुळाशी ह्याच सूचना आहेत. तेथील प्रशासकीय अधिकारी पार्श्वभूमीत राहून कारभार चालवतात – अधिकार गाजवत नाहीत. परन्तु अशा संस्था भारतातील शिक्षणक्षेत्रातल्या वाढत्या वाळवंटात मरूजलभूमीप्रमाणे बोटावर मोजण्याइतक्याच असतील.

केंब्रिज विद्यापीठात कुलगुरूची जागा तिथल्या कॉलेजमधल्या प्राचार्यांना दर दोन वर्षांनी क्रमाक्रमाने दिली जाते. जनरल बोर्ड आणि कौन्सिल ऑफ सिनेट ह्या दोन समित्या विद्यापीठाचा कारभार चालवतात. परन्तु बाहेरच्या जगाला माहीत असतात तिथले अध्यापक आणि संशोधक. एखादा प्राचार्य केंब्रिजचा कुलगुरू निवडून आल्यामुळे त्याचा सत्कार झाल्याचे माझ्या तरी ऐकिवात नाही. परन्तु एखाद्या संशोधकाने लावलेल्या शोधाचे कौतुकाने केलेले उल्लेख वर्तमानपत्रे, रेडिओ आणि टी. व्ही.वर होतात. केंब्रिजमधल्या परीक्षांत विद्यार्थ्यांचे नाव, कॉलेज इत्यादींचा उत्तरपत्रिकेवर स्पष्ट निर्देश असतो. पण त्यामुळे भ्रष्टाचाराची एकही केस अस्तित्वात

---

एखाद्या प्रथितयश शास्त्रज्ञाने, संशोधकाने किंवा अध्यापकाने एखादे अधिकाराचे पद स्वीकारावे का ? हा प्रश्न बरेच वेळा विचारण्यात येतो. अर्थात कोणी कुठले पद केव्हा स्वीकारावे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. आपल्या क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावलेला विद्वान हा उत्तम प्रशासक होईलच असे नाही ! अनेक उदाहरणे अशी पण आहेत, जिथे केवळ शासकीय श्रेणीतून वर आलेल्या प्रशासकापेक्षा शिक्षणक्षेत्रातून आलेला प्रशासक अधिक कार्यक्षम ठरला. तेव्हा वरील प्रश्नाला दोन्ही बाजूंनी उत्तर देता येईल. मला इतकेच म्हणायचे आहे की, विद्वानांनी आपण होऊन अशा अधिकारपदांमागे लागू नये ! किंवा आपले महत्त्व दाखवण्याकरता अधिकारी व्यक्तींपुढे लाचारी पत्करू नये. त्यांचे पूर्वज – पूर्वीचे ऋषी-मुनी – हे स्वत:ला राजगुरू किंवा राजपुरोहिताचे पद मिळावे म्हणून राज्यकर्त्यांची मनधरणी करत नसत. ते आपल्या आश्रमात तपश्चर्येत किंवा विद्यादानात वेळ घालवत. राजाने मदतीकरता बोलावले, तरच ते राजधानीत जात. किंवा आपल्या विद्यादानात अडथळे निर्माण झाले, तर राजाची मदत घेण्यासाठी राजाकडे जात. पण कुठल्याही परिस्थितीत राजाच त्यांच्यापुढे मान वाकवी.

सध्या उलटे घडत आहे !

**(या लेखातील विचार वैयक्तिक स्वरुपाचे असून त्यांच्याशी माझे सहकारी सहमत असतीलच असे नाही.)**